Vol II Issue V Nov 2012

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

# Monthly Multidiciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 5, Nov. 2012
**ISSN:-2231-5063**
Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# दलित साहित्याने मराठी साहित्याला दिलेले योगदान

*निगडे सुनील जगन्नाथराव*

मराठी विभाग प्रमुख
ए.सि.दिवेकर महाविद्यालय,वरवंड ता.दौड,जि.पुणे

***सारांश :***

मराठी साहित्यात दलित साहित्याने मोलाची भर घातली आहे. त्यामध्ये आशय आणि अभिव्यक्तीदृष्टया भाषेचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. आजपर्यंत अपरिचीत असलेली भाषेची अनेक रूपे दलित साहित्याने प्रकट केली. एवढेच नव्हे तर भारतीय जीवनविषयक,संस्कृतीविषयक, कलाविषयक चिंतनाला प्रेरणा मिळाली तीही दलित साहित्याच्या उदयाने. मराठी साहित्याला एका बंधिस्त चाकोरीतून बाहेर काढून सामाजिकतेचे एक प्रभावी अंग तर दिलेच परंतु त्याचबरोबर व्यापक जाणीवेचे,क्रिया–प्रतिक्रीयात्मक जागृतीचे प्रभावी चैतन्य निर्माण केले.

***प्रस्तावना :***

एकंदरीत कलादृष्टया अनेक कथाकार,अनेक कवी, अनेक आत्मकथनकार जन्माला आले ते दलित साहित्यातून. प्रचलित मराठी साहित्यातून वेगळे मुल्य, वेगळी आशयघनता, जाणीवेची वेगळी रूपे, अभिव्यक्तीची नवी तंत्रे निर्माण होतील अशा प्रकारचा विश्वास दलित साहित्याने निर्माण केला. त्याला कारण निखळ मानवता हे दलित साहित्याचे केंद्र बनले म्हणून. दलित साहित्य चळवळीने अनेक दलित तरूण तरूणींना लिहिते केले व त्यामुळे मराठी साहित्यामध्ये काही अव्वल दर्जाच्या साहित्यकृतींची भर पडली. याच दलित चळवळीने दलित लेखकामध्ये एक आक्रमक आत्मविश्वास निर्माण केला. हेच दलित साहित्याचे मराठी साहित्याला दिलेले फार मोठे योगदान आहे.

दलित साहित्याने महत्वपुर्ण असे अभिसरण सुरू केले. पुर्वास्पृश्य जातीजमातींच्या गतजीवनाविषयी जे अज्ञान होते ते दुर झाले. ही बाब महाराष्ट्रीयन समाजजीवनाच्या व मराठी साहित्याच्या निकोप वाटचालीच्या दृष्टीने मोठी फलसिध्दी आहे. मराठी साहित्याला दलित साहित्याने सामजिक भान दिले. दलितांना व दलितेतरांना आपण सामाजीकदृष्टया कोठे आहोत?याची कल्पना या साहित्याने दिली. त्यामुळे मराठी साहित्याला एक प्रकारची गती प्राप्त झाली. साहित्य व समाज यांच्या दृष्टीने ही घटना महत्वाची आहे.

दलित साहित्याने परंपरागत मराठी साहित्य नाकारले तेव्हा मराठी साहित्याला संस्कृतीच्या अंगाने एक वेगळी दृष्टी मिळाली. जातीसंस्था नाकारून हिंदू धर्माच्या अनैतिक धारणेवर आघात केला. हिंदू धर्मातील ब्राम्हणीवृत्ती नष्ट करून त्याठिकाणी या साहित्यामध्ये स्वातंत्र, समता, बंधुता निर्माण केली. सर्वप्रकारच्या विषमतेला नकार दिला. दलित साहित्याने हिंदू आराध्य दैवते कोसळून टाकली त्याप्रसंगी त्यांचा विद्रोह प्रकट झाला. दलित साहित्यीकांनी सांस्कृतीक व वाड्मयीन आदर्शाची समीक्षा केली. क्रांतीचा उद्गार धीटपणे मांडला. उदा. यशवंत मनोहर, नामदेव ढसाळ यांच्या कविता या दृष्टीने महत्वाच्या वाटतात.

मराठी साहित्याला दलित साहित्याने एक मौलिक दृष्टी दिली. खुप प्रभावी,बेडर नायक मराठी साहित्याला दलित साहित्यानेच दिला. असा नायक मराठी साहित्याने या पुर्वी पाहिलेला नव्हता आणि म्हणूनच मराठी साहित्यावर दलित साहित्यामुळे एकीकडे जसा सामाजीक परिणाम झाला तसा साहित्यीक परीणाम झाला. अज्ञात असलेल्या जीवनाची दालने दलित साहित्यामुळे उघडी झाली. या साहित्याने सामाजीक भान तीव्र केले. मराठी साहित्याच्या इंद्रीय संवेदनेचे अनुभवविश्व जे मर्यादीत होते ते व्यापक बनविले. मराठी साहित्याला विविधता, विचीत्रता आणून दिली ती दलित साहित्यानेच.

दलित साहित्याने दलित जीवनातील भावनांना, जाणीवांना अभिव्यक्ती देणारी भाषा दिली. व त्यामुळे मराठी साहित्याला एक भाषीक समृध्दी लाभली. आजपर्यंत अनेक अपरिचीत असलेली भाषेची अनेक रूपे दलित साहित्यातून प्रकट झाली. अनेक शब्द, म्हणी, वाक्प्रचार या साहित्याने मराठी साहित्याला देवून त्याची नवी रूपे मिळाली. मराठीत ज्या शब्दांचा उच्चार होत नव्हता त्या शब्दांचा वापर होवू लागला. त्यातून बोलीभाषेचे सौंदर्य प्रकर्षाने जाणवले याचा प्रत्यय दलित कथा कविता आत्मकथनामध्ये येतो.

दलित कथा साहित्याचे प्रचलीत मराठी साहित्यप्रवाहातील वेगळे महत्व विशेषत्वाने जाणवते. एवढेच नव्हे तर मराठी साहित्याला दलित साहित्य मोठेपणही देत आहे. दलित कथेने विशिष्ट बोलीभाषेच्या माध्यमातून मराठी भाषेला एक समृध्दी प्राप्त करून दिलेली आहे. वेगवेगळया जीवनातील अपरिचीत वातावरण व अनुभव व्यक्त करायला ग्रांथीक मराठी भाषा सर्वस्वी पुरेशी नव्हती. दलित लेखकांची कथा चीड, संताप,विद्रोह यांनी पेटलेली आहे. तीच्यामध्ये एक प्रकारची धग आहे. ही धगच आजच्या मराठी कथेत जीवंत प्रवाहाचा ओघ आणण्यात यशस्वी झालेली आहे. प्राध्यापक रा.ग.जाधव दलित कथेबद्दल म्हणतात की, ''दलित वास्तवाची दीक्षाभुमी मोठया प्रमाणावर अजुनही दलित कथेबाहेर आणि साहित्यावर राहिलेली आहे. व ती आविष्कारासाठी आवाहान करीत आहे.'' दलित कथेचे वास्तव रूप वरील उद्गारातून आपणास समजते. दलित कथा ही पारंपारीक किंवा मराठी नवकथेहून सर्वस्वी भिन्न नाही. तीच्या प्रेरणा व परीसर यातील वेगळेपणा स्पष्ट आहे. ती मराठी कथेशी नाते राखुन आहे. शिवाय तीच्या अवतीभोवती पुर्वीपासून आजपर्यंत मराठी कथेचे परीघ विस्तारले आहे. अनुभुतीच्या अभिव्यक्तीसाठी दलित कथेने काही निराळया प्रतिमा व बोलींचा अवलंब केला आहे. प्रत्यक्षात आज मराठी नवकथेतील कित्येक समर्थ लेखकांच्या निर्मीतीसाफल्यात प्रतिक व शैली यांचा काहीसा भिन्नपणा आजही जाणवतो. उदा. जी.ए.कुलकर्णी, दिलीप चित्रे, सानीया इत्यादी. दलित कथेत कौटूंबीक जीवनचित्रणातील गहनता साकल्याने प्रत्ययास येते. 'माणूसकीला अचवलेला माणूस' या कटूसत्याला अखील दलीत कथेने प्रखरतेने केंद्रस्थानी मानले. या वास्तव वैशिष्टयाने दलित कथा मराठी साहित्यातील वेगळेपणाबरोबर नावीन्यपुर्ण व वास्तववादी प्रवाह आहे याचा प्रत्यय येतो. यामुळे

मराठी कथा साहित्याचे दालन समृध्द होईल. यात शंका नाही. दलित साहित्य प्रवाहात कथा वाड्मय प्रकारात विपुल लेखन झालेले आहे. मराठी कथा या कथेने या अर्थाने समृध्द केलेली आहे. बंधुमाधव, आण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल, अमीताभ, वामन होवाळ, योगीराज वाघमारे, केशव मेश्राम, अविनाश डोळस इत्यादी कथालेखकांचा या संदर्भात नामोल्लेख करावा लागतो.

1990 नंतरच्या दलित साहित्यातही सामाजीक बांधिलकी मानणारा वर्ग उदयास आला. कवीतेच्या प्रांतामध्ये गंगाधर आहिरे, संभाजी भगत, विवेक मोरे, उषा अंभोर, बळवंत कांबळे, बबन लोंढे, आकाश सोनावणे, महादेव रोकडे, रमेश भवार, उत्तम पवार, अविनाश गायकवाड, विजय मोहिते, सुदेश जगताप, बबन सरवदे, सिध्दार्थ तांबे, यासारखी नविन नावे परिचीत होवू लागली. गणेश वसईकर सारखा दलित कवी नव्वदच्या दशकात शहरी व ग्रामीण जीवनाच्या सर्वच स्तरावर होवू लागलेल्या पडझडीला कवीतेच्या रुपाने साकार करतो. या शहरीकरणाच्या, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत माणूस माणसापासून कसा दुर चालला आहे याचे दर्शन घडविताना म्हणतो,

आज इथे ?
असाच
एकटेच ?
एकटाच

तर जागतिकीकरणाने सर्वसामान्य आणि कष्टकरी माणसाच्या आयुष्याचे तीन तेरा कसे वाजले त्याचे चित्रण विजय मोरे यासारखा कवी आपल्या कवीतेत करताना म्हणतो

काल इथे गिरण होती
गिरणीमध्ये कामगार होता
कामगाराचे घर होते
घरामध्ये बायको होती
पोटी चार पोरं होती
पण मने इथली अरूंद झाली
कालच गिरण बंद झाली
गिरण गेली,बिल्डर आला
कालचा कामगार कुठे गेला ?

अशा काही कवितामधून बदलते समाजवास्तव दलित कवितेने टिपलेले दिसते.

आजच्या दडपलेल्या अनुभव विश्वाला दलित साहित्याने मुक्त केले. एवढेच नव्हे तर या नव्या अनुभव विश्वाला सामारे जाण्याचे धाडस दलित चळवळीने दिले. आजपर्यंतच्या मराठी साहित्यात कल्पनेलाच अधिक महत्व होते. त्यामध्ये वास्तवता कमी होती. परंतु दलित साहित्याने कल्पनेला फाटा देवून वास्तवतेला अधिक महत्व दिले. आणि माणूस जोडण्याचे फार महत्वाचे कार्य याच वास्तव रूपाने दलित साहित्याने केले. अभिव्यक्ती व अविष्काराच्या बाबतीत दलित साहित्याने मराठी साहित्याला फार मोठी देणगी दिली आहे. याच दलित साहित्याने मराठी साहित्याला नवा आशय, नवी शैली त्याचबरोबर मराठी साहित्याला आत्मनिवेदनाचा नवा फॉर्म दिला. उदा. बलुतं (दया पवार), मु.पो.देवाचे गोठणे (माधव कोंडविलकर), आठवणींचे पक्षी(प्र.ई.सोनकांबळे) इत्यादी.

1990 नंतर च्या काळात मराठी साहित्याला जसे दलित कवितेने श्रीमंत केले तसे दलित आत्मकथनाने ही श्रीमंत केले. या काळातील आत्मकथनांचा विचार करता प्रामुख्याने ना.म.शिंदे यांचे 'जातीला जात वैरी', द.शि.सवाखंडे यांचे 'मरणकळा' ही आत्मकथने महत्वाची वाटतात. याच वाटचालीमध्ये किशोर शांताबाई काळे यांचे 'कोल्हाटयाचं पोर', आर.के.त्रिभुवन यांचे 'दे दान सुटे गिराण', प्रल्हाद चेंदवणकरांचे 'टाच', वैजनाथ कळसे यांचे 'ऐरणीच्या घणा', गौतम कांबळे यांचे 'बावळट', चंद्रकांत जाधव यांचे 'ढगाआडचा चंद्र' व डॉ.नरेंद्र जाधव यांचे 'आमचा बाप व आम्ही' इत्यादी आत्मकथनांचा विचार करावा लागतो. या सर्व आत्मकथनांनी मराठी साहित्याला भाषा व अभिव्यक्तीच्या अंगाने समृध्द केले. मानवी जीवन समजून घेण्याच्या दृष्टीने दलित आत्मकथा महत्वाची ठरली. दलितांकडे पाहण्याची दृष्टी त्यामुळेच बदलली. दलित साहित्याची आणि आत्मकथनांची वाड्मयीन पार्श्वभुमी लक्षात घेतल्यावर विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात प्रसिध्द झालेले डॉ.नरेंद्र जाधव यांचे 'आमचा बाप व आम्ही' हे आत्मकथन जागतीक स्तरावर अधिक सक्षमतेने उभे राहिलेले दिसते. भारतीय समाजातील जातीव्यवस्थेची कक्षा ओलांडून जाधव कुटूंब जागतीक जाणीवेशी आणि संवेदनेशी कसे जोडले हेच आपणास पहावयास मिळते. सलग चार पिढयांचे जीवनचरीत्र डॉ.जाधव यांनी आपल्या आत्मकथनात रेखाटले आहे. दलित साहित्यात हे आत्मकथन वेगळे तर आहेच परंतु एकुणच मराठी साहित्यातही हे आत्मकथनाचे स्थान वेगळे असे आहे. फार मोठे योगदान अशा प्रकारच्या आत्मकथानामुळेच मराठी साहित्याला लाभलेले दिसते.

दलित साहित्याने प्रस्थापित समीक्षेलादेखील नवी परीमाणे दिली. साहित्याचे पारंपारीक निकष हे विषम समाजव्यवस्थेकडून निर्माण झालेले असल्याने दलित साहित्याला ते लावता येणार नाहीत अशी भुमीका दलित साहित्य समीक्षकांनी घेतली. दलित साहित्य हे पेटत्या धगधगत्या जीवनातून निर्माण झालेले असून त्यात अनुभवातील संपन्नता,आशयातील उत्कटता, मायबोलीतील रसरशीतपणा, अविष्कार पध्दती वेगळीच आहे. दलित लेखक हा स्वताशी, त्याच्या जीवनअनुभवाशी प्रामाणीक असतो. त्याच्या पेटत्या मनाची अस्मिता त्याच्या साहित्यातून अभिव्यक्त होत राहते. त्यामुळे एक स्वतंत्र अशी रचना दलित साहित्याची झालेली दिसते. याच दलित समिक्षेविषयी प्रा.म.भि.चिटणीस म्हणतात की, ''मराठी समीक्षा ही मराठी साहित्यावर वाढलेले बांडगुळ आहे. ही समीक्षा येथील जमीनीतून स्फुरली नाही, परंतु दलित साहित्य हे जीवनवेधी आहे. ते संस्कृतीचे एक अंग आहे'' अशा प्रकारे मराठी साहित्याला सामाजीक आशय देणा—या दलीत साहित्याने समीक्षेच्या क्षेत्रामध्ये पुनर्विचार करण्यास प्रवृत्त केले हे ही एक योगदानच आहे.

भारतीय जीवनविषयक, संस्कृतीविषयक, कलाविषयक चिंतनाला प्रेरणा ही दलित साहित्याच्या निर्मीतीमुळे मिळाली. मराठीतील ब—याच साहित्याला सामाजीकतेचे प्रभावी अंग लाभुन व्यापक जाणीवेचे, क्रिया—प्रतिक्रीयात्मक जागृतीचे चैतन्य निर्माण झाले आहे. आत्तापर्यंत व्यक्तीनिष्ठ असलेली मराठी साहित्याची जाणीव ही सामाजीक पातळीवर जावून ती समाजनिष्ठ बनली. विषयदृष्टया मराठी साहित्याच्या इतिहासात जे जीवनमुल्य आलेले नव्हते ते जीवनानुभवातील जीवनमुल्य दलित साहित्यात येवू लागले. अशा प्रकारे दलित साहित्याने अनुभवदृष्टया, भाषादृष्टया मराठी साहित्याला समृध्द केले.

*संदर्भ ग्रंथ –*

1.दलित साहित्याचे सौदर्य शास्त्र – शरणकुमार लिंबाळे
2.समाज आणि साहित्य समीक्षा – डॉ.यशवंत मनोहर
3.दलित साहित्य जेव्हा चळवळ बनते – योगेंद्र मेश्राम
4.दलित कवितेतील नवे प्रवाह – महेंद्र भवरे
5.मराठी कथा प्रवृत्ती आणि प्रवाह – डॉ.रा.गो.चवरे

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net